नवी आशा नवी दिशा
# सार्वमत



## वांबोरीत कांदा ३१०० रुपये



**राहुरी (तालुका प्रतिनिधी)–** सोमवार २४ जून रोजी वांबोरी उपबाजारात झालेल्या कांदा लिलावात ११ हजार १९१ कांदा गोण्यांची आवक झाली. एक नंबरचा कांदा २४०५ ते ३१०० रुपये, दोन नंबरचा कांदा १७०५ ते २४०० रुपये तर तीन नंबरचा कांदा ३०० ते १ ७०० रुपये भावाने विकला गेला. तसेच गोल्टी कांद्याला १७०० ते २४०० रुपये भाव मिळाला. अपवादात्मक ३२ कांदा गोण्यांना ३ ४०० रुपये, ३२ कांदा गोण्यांना ३३०० रुपये तर १८५ कांदा गोण्यांना ३२०० रुपये भाव मिळाला.

## कोल्हार उपबाजारात सोयाबीन ४४४६ रुपये क्विंटल

**कोल्हार (वार्ताहर)–** राहाता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कोल्हार बुद्रुक येथील उपबाजारात सोमवारी सोयाबीनची १२ क्विंटल आवक झाली. सोयाबीन कमीत कमी ४३८५ रुपये तर जास्तीत जास्त ४४४६ रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी करण्यात आली. सोयाबीन सरासरी ४४०० रुपये प्रती क्विंटल दराने खरेदी करण्यात आली. तसेच कोल्हार उपबजारात गव्हाची १६ क्विंटल आवक झाली. गहू कमीत कमी २६१२ रुपये तर जास्तीत जास्त २८०० रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी करण्यात आला. गहू सरासरी २७०० रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी करण्यात आला.




## महत्त्वाचे

### श्रीरामपुरात कांदा ३२०० रुपयांपर्यंत

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** श्रीरामपूर बाजार समितीत काल कांद्याची १९३६२ गोण्यांची आवक झाली. गोणीतील कांद्याला ३२०० रुपये क्विंटलपर्यंत तर मोकळ्या कांद्याला २७०० रुपयांपर्यत दर मिळाला. एक नंबर कांद्याला २४०० ते ३००० रुपये , दोन नंबर १७०० ते २३५० रुपये, तीन नंबर ९०० ते १६५० रुपये तर गोल्टीला १७०० ते २३०० व खादला २०० ते ९०० रुपये दर मिळाला. तर बाजार समितीत ८६ वाहनांद्वारे मोकळ्या कांद्याची अवक झाली. यामध्ये एक नंबर कांद्याला २२०० ते २७००, दोन नंबर कांद्याला १७०० ते २१५०, तीन नंबर १३०० ते १६५० रुपये तर गोल्टी कांद्याला १७०० ते २३०० रुपये इतका भाव मिळाला असल्याची माहिती सभापती सुधीर नवले, सचिव साहेबराव वाबळे यांनी दिली.

### राहाता बाजार समितीत डाळिंब २५५ रुपये किलो

**राहाता (तालुका प्रतिनिधी)–** राहाता बाजार समितीत सोमवारी डाळिंबाच्या ७२१० कॅरेटची आवक झाली. डाळिंब नंबर १ ला किमान १६१ रुपये तर जास्तीत जास्त २५५ रुपये प्रतिकिलो भाव मिळाला. डाळिंब नंबर २ ला किमान ११६ रुपये तर जास्तीत जास्त १६० रुपये. डाळिंब नंबर ३ ला किमान ४६ ते जास्तीत जास्त ११५ रुपये. डाळिंब नंबर ४ ला किमान १० रुपये तर जास्तीत जास्त ४५ रुपये असा भाव मिळाला. सोयाबीनची ३ क्विंटलची आवक झाली. सोयाबीनला किमान ४३२५ रुपये, जास्तीत जास्त ४३८५ रुपये तर सरासरी ४३५५ रुपये भाव मिळाला. गव्हाला किमान २५५० रुपये, जास्तीत जास्त २६८१ रुपये तर सरासरी २६१५ रुपये भाव मिळाला. ज्वारीला किमान १९०१ रुपये, जास्तीत जास्त २०५१ रुपये तर सरासरी १९७६ रुपये. हरभरा सरासरी ६२०० रुपये भाव मिळाला. बाजरीला सरासरी २१०० रुपये भाव मिळाला.

### पुणतांबामार्गे वाहतूक अद्यापही विस्कळीत

**पुणतांबा (वार्ताहर)–** पुणतांबा मार्गे कोपरगाव व श्रीरामपूरकडे जाणारी वाहतूक अद्यापही सुरळीत झालेली नाही. पुणतांबा येथे रेल्वेच्या दुहेरीकरणाचे काम सातत्याने सुरू आहे. तसेच रेल्वे फाटकाचे रुंदीकरण तसेच कॉड लाईनच्या संगणीकरणाचे काम वेगाने सुरू आहे. बऱ्याच वेळा कामाची दुरुस्ती करण्यासाठी पूर्वसूचना देऊ काम बंद ठेवले जाते. बऱ्याच वाहन चालकांना व प्रवाशी वर्गाला पुरेशी माहिती आगाऊ मिळत नाही. त्यामुळे बऱ्याच वेळा रेल्वे फाटक बंद असल्यामुळे अनेकांना पर्यायी मार्गाने जावे लागते. त्यामुळे अनेक प्रवाशी वर्गाने पुणतांबा मार्गे जाण्यापेक्षा चांगदेवनगर किंवा चितळीमार्गे जाण्याचा पर्याय निवड आहे. चांगदेवनगर मार्ग पुणतांबा गणपती फाटा–चांगदेवनगर–पुणतांबा रस्ता अरुंद असल्यामुळे अनेकांनी या मार्गाने जाण्यापेक्षा इतर पर्यायी मार्गाचा विचार केलेला आहे. पुणतांबा येथे उड्डाण पूल किंवा रेल्वेच्या भुयारी पुलाचा प्रश्न मार्गी लागला तर वाहतुकीची समस्या सुटू शकते, अशी वाहनचालकांत चर्चा आहे.

# शिर्डी विमानतळाची संरक्षक भिंत चौथ्यांदा कोसळली

**रांजणगाव देशमुख (वार्ताहर)–** साईभक्तांच्या सोयीसाठी कोपरगाव तालुक्यातील काकडी येथे असलेल्या शिर्डी विमानतळाची संरक्षक भिंत काकडी–संगमनेरकडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजुने सोमवारी दुपारी पावसामुळे कोसळली आहे. विमानतळाची संरक्षक भिंत कोसळण्याची ही चौथी वेळ आहे. त्यामुळे विमानतळाच्या सुरक्षेच्या बाबतीत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

यापुर्वीही तीनदा विमानतळाची संरक्षक भिंत कोसळली होती. तिसऱ्यांदा तर चार ठिकाणी भिंत कोसळली होती. सोमवारी दुपारच्या दरम्यान झालेल्या किरकोळ पावसामुळे विमानतळाची भिंत चौथ्यांदा कोसळली. फायर स्टेशच्या थोडे पुढे ही भिंत कोसळली आहे. तिसऱ्यांदा भिंत कोसळली त्या वेळेस शेजारील शेतकऱ्यांच्या शेतात पाणी घुसून नुकसान झाले होते. संरक्षक भिंतींचे काम चालु असताना स्थानिकांनी हे काम निकृष्ठ होत असल्याच्या तक्रारी केल्या होत्या. मात्र तेव्हाच्या आधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केले होते. संरक्षक भिंत पडल्यामुळे या कामाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. सातत्याने संरक्षक भिंत कोसळत असताना विमानतळ विकास प्राधिकरण त्याकडे दुर्लक्ष करत आहे. अगदी निकृष्ठ पध्दतीने या संरक्षक भिंतीचे काम करण्यात आले आहे.

विमानतळ सुरू झाल्यानंतर सर्वाधिक पसंती या विमानतळास मिळाली मात्र प्रवाशांच्या सुमार दर्जाच्या सोयीच्या बाबतीत नेहमीच हे विमानतळ चर्चेत असते.



शिर्डी विमानतळाची सोमवारी काकडी–संगमनेर रस्त्याच्या बाजूने पडलेली संरक्षक भिंत.

## व्हॉट्सॲपवर धमकीचे मेसेज केल्याप्रकरणी दत्तनगरच्या तरुणावर गुन्हा दाखल

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** श्रीरामपुरात एका शाळकरी मुलीला मोबईव्दारे मेसेज करून असभ्य वर्तन केले तसेच कुटुंबियांचा काटा काढील अशी धमकी दिली. याबाबत श्रीरामपूर पोलीस ठाण्यात ॲट्रोसिटीसह विविध कलमान्वये एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शफिक हसन बागवान रा.दत्तनगर, ता.श्रीरामपूर असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत अल्पवयीन मुलीने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, आरोपीने मोबाईलवरून हाय असा मॅसेज पाठवून त्यानंतर वेळोवेळी फिर्यादीची मामी कोठे आहे? असे बोलून फिर्यादीची मामी हिच्याविषयी चौकशी करत असे तसेच दि. ०६ जून २०२४ रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास फिर्यादी शहरातील एका शाळेत क्लाससाठी गेली असताना त्या ठिकाणी फिर्यादीच्या शाळेच्या आवारात येऊन आरोपीने स्वतः ची ओळख लपवून तोंडाला रुमाल बांधून व डोळ्याला चष्मा लावून फिर्यादीकडे आला व तू माझ्यासोबत व्हॉट्सॲपवर चॅटींग का करत नाही. तू तुझ्या मामीला घेऊन बेलापूर रोडवरील रसवंतीवर ये व तुझ्या मामीने बोलायला नकार दिला तर तू माझ्या सोबत बोलत जा. तू आता वयात आली आहे. दिसायला छान आहे. माझ्यासोबत चॅटींग केली नाहीतर मी तुझ्या घरच्यांचा काटा काढीन, अशी धमकी दिली आहे. तसेच धमकी दिलेले मॅसेज डिलीट करत असे. तसेच मी सायकल वरून घरी जात असताना माझ्या सायकलचा पाठलाग करून पुन्हा तू तुझ्या मामीला माझ्यासोबत बोलायला सांग व तू व्हॉटसॲपला मॅसेज कर असे बोलून निघून गेला तसेच दि. २० जून रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास पुन्हा व्हॉट्सॲपवर मॅसेज पाठवून माझ्या मामीबद्दल विचारपूस करुन मला मॅसेज केले आहे. असे फिर्यादीत म्हटले आहे.

यावरून शफिक हसन बागवान, रा. दत्तनगर, ता. श्रीरामपूर यांच्या विरोधात विनयभंग, ॲट्रोसिटीसह पोस्को कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## प्रलंबित अनुदान शेतकऱ्यांना तातडीने मिळावे

### आमदार काळेंची उपमुख्यमंत्र्यांकडे मागणी

**कोपरगाव (प्रतिनिधी)–** कोपरगाव विधानसभा मतदार संघातील विविध अनुदान योजने अंतर्गत शेतकऱ्यांचे प्रलंबीत अनुदान व सन २०२३-२४ मधील पीक विमा कंपनीकडे प्रलंबीत असलेली ७५ टक्के रक्कम अजूनही शेतकऱ्यांना मिळालेली नाही. त्यामुळे सदरचे प्रलंबित अनुदान हे तातडीने शेतकऱ्यांच्या खाती वर्ग व्हावे, अशी मागणी आ.आशुतोष काळे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचेकडे केली आहे.



आ.आशुतोष काळे यांनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांची भेट घेऊन प्रलंबित अनुदानाबाबत निवेदन दिले. निवेदनात म्हटले आहे, कोपरगाव विधानसभा मतदार संघातील प्रधानमंत्री पीकविमा योजना सन २०२३-२४ अंतर्गत खरीप हंगामात पावसाने खंड दिल्यामुळे सर्व पीकविमाधारक शेतकऱ्यांना पीकविमा कंपनीकडून उर्वरित असलेली ७५ टक्के पीकविमा रक्कम आजपर्यंत मिळालेली नाही. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना व कृषी मशिनीकरण प्रस्तुतीकरण योजनेचे २०२२-२३ मधील अनुदान, कृषी विभागाचे सन २०२२-२३ व २०२३-२४ चे ठिबक सिंचन, तुषार सिंचन, कांदा चाळ व कृषी यांत्रिकीकरण २०२२-२३ व २०२३-२४ चे अनुदान देखील प्रलंबित आहे. तसेच कोपरगाव विधानसभा मतदार संघात टाकळी फाटा, कोपरगांव येथे झालेल्या ढगफुटी सदृश पावसामुळे बाजार समितीचे कांदा खरेदीदार व्यापारी यांचे कांदा नुकसानीचे शासकीय पंचनाम्यानुसार अंदाजित रक्कम ५ कोटी रुपये अनुदान, सन २०२२-२३ मधील १६७३ शेतकऱ्यांची अतिवृष्टीची नुकसान भरपाई तसेच महात्मा फुले कर्ज मुक्ती योजना २०१९ अंतर्गत नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या ५०० शेतकऱ्यांचे प्रलंबित अनुदान व सन २०२२-२३ मधील शेतकऱ्यांचे कांदा अनुदान प्रलंबित आहे. हे सर्व अनुदान तातडीने शासनाने शेतकऱ्यांच्या खाती वर्ग करावे, अशी मागणी आ. आशुतोष काळे यांनी यावेळी केली आहे.

## अहमदनगर रायफल शुटिंग क्लबच्या ४ खेळाडूंची इंडियन टीम ट्रायलसाठी निवड



**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** भोपाळ (मध्य प्रदेश) येथे पार पडलेल्या २२ वी कुमार सुरेंद्रसिंह मेमोरियल शूटिंग चॅम्पियनशिप (रायफल,पिस्तूल) राष्ट्रीय रायफल शूटिंग स्पर्धेमध्ये अहमदनगर सिटी रायफल ॲण्ड पिस्तोल स्पोर्ट्स शूटिंग क्लबच्या १० मीटर एअर रायफल प्रकारामध्ये राजनंदनी काळे, तेजसकुमार किरगत व १० मीटर एअर पिस्तोल खेळ प्रकारात स्वामिनी जेजुरकर, श्रावणी भगत या खेळाडूंनी घवघवीत यश संपादन केले असून त्यांची इंडियन टीम ट्रायल करता निवड झाली आहे.

यशस्वी खेळाडूंना प्रशिक्षक ऋषीकेश दरंदले, आलिम शेख, सागर फाटके यांचे मार्गदर्शन लाभत आहे. तर खेळाडूंना आमदार संग्राम जगताप, खासदार निलेश लंके, जिल्हा क्रिडा अधिकारी श्री. दिघे, श्रीमती दीपाली बोडखे, ज्ञानेश्वर खुरंगे, विशाल गर्जे यांनी पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## जेऊर पाटोदा येथे शेतात आढळला बिबट्याचा मृतदेह



**कोपरगाव (तालुका प्रतिनिधी)–** कोपरगांव तालुक्यातील जेऊर पाटोदा येथे शेतात बिबट्याचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. काही दिवसांपुर्वीच पोहेगाव शिवारात मृत बिबट्या अढळला होता.

कोपरगांव शहराच्या लगत जेऊर पाटोदा हद्दीत केकाण वस्ती लगत पुंडलिक बोरावके हे शेतीमध्ये सोमवारी शेती कामासाठी गेले असता त्यांना मृत अवस्थेत पडलेला बिबट्या दिसला. त्यांनी मनीषा केकाण व सतीश केकाण यांना माहिती दिली. सतीश केकाण यांनी घटनेची माहिती वन विभागाच्या अधिकाऱ्यांना दिली.

या बिबट्याचा मृत्यू कशामुळे झाला याबाबत नागरिकांमध्ये विविध तर्क-वितर्क लावले जात आहेत. वन विभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले असून पुढील कारवाई ते करत आहेत. सदरच्या घटनेमुळे परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वनाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली बिबट्याचा मृतदेह वनविभागाच्या कार्यालयात हलवण्यात आला असून बिबट्याचा मृत्यू कोणत्या कारणाने झाला त्याचा शोध वन विभागाचे वैद्यकीय अधिकारी घेत आहेत.

## बचतगटाच्या माध्यमातून महिलांना आर्थिक सुबत्ता मिळवून देण्याचा मानस- कोते

**शिर्डी (प्रतिनिधी)–** शहरातील बचत गटाच्या महिलांनी तयार केलेल्या खाद्यपदार्थांना हॉटेल इंडस्ट्रीजच्या माध्यमातून आर्थिक सुबत्ता मिळवून देण्याचा मानस असल्याची भावना शिर्डीचे प्रथम नगराध्यक्ष कैलासबापू कोते यांनी व्यक्त केली.

साई सिद्धी चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कैलास कोते यांच्या पुढाकाराने शहरातील बचत गटाच्या महिलांसाठी एक दिवसीय मोफत उद्योजकता परिचय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी एम.सी.ई.डी चे जिल्हा प्रकल्प अधिकारी तात्यासाहेब जिवडे, व्यावसायीक कमलेश कोते, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख कमलाकर कोते, गोपीनाथ गोंदकर, हरिश्चंद्र कोते, विकास गोंदकर, दत्ता कोते, शफीक शेख, सुलक्षणा कोते, अर्चनाताई शिंदे, जयश्री गाडवे, ज्योती महाले, वनिता शिंदे, सुलोचना कोते, शीतल शिंदे, वंदना शिंदे आदींसह बचत गटाच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.




श्री.कोते यांनी ही कार्यशाळा राबविली असून शासनाच्या माध्यमातून अनेक योजना बचत गटांसाठी असतात मात्र त्याचा लाभ आणि उपयोग कसा करून घ्यायचा याबाबत बचत गटांच्या महिलांना मार्गदर्शन मिळत नाही त्या अनुषंगाने व्यवसाय जाहिरात आणि विक्री कशी करावी याविषयी तंत्रशुद्ध मार्गदर्शन जिल्हा अधिकारी तात्यासाहेब जिवडे व प्रसिद्ध व्यावसायिक कमलेश कोते यांनी उपस्थित महिलांना केले.

यावेळी कोते म्हणाले, शिर्डीतील बचत गटाच्या महिलांना यापुढे व्यवसायासाठी तसेच शिर्डीत महिला उद्योजक निर्माण व्हाव्यात यासाठी साई सिद्धी चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून विविध कार्यशाळा आयोजित करणार असून महिलांना बचत गटाच्या माध्यमातून व्यवसायासाठी कर्ज उपलब्धता, व्यवसायासाठी जागा, मालाची विक्री, जाहिरात, उत्पादीत केलेल्या मालाला बाजारपेठ उपलब्ध करण्याच्यादृष्टीने शहरातील हॉटेल व्यावसायिकांची बैठक घेऊन संबंधित प्रश्न मार्गी लावण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील राहणार आहे. सूत्रसंचालन भाजपचे शहराध्यक्ष विकास गोंदकर यांनी केले तर आभार हरिश्चंद्र कोते यांनी मानले.

नवी आशा नवी दिशा सार्वमत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक राजेंद्र कृष्णराव सोनवणे यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि. यांच्याकरिता प्लॉट क्र. एन.११, एम.आय.डी.सी, अहमदनगर येथे मुद्रित करुन प्लॉट क्र. एन. ११, एम.आय.डी.सी, अहमदनगर ४१४१११ येथे प्रसिध्द केले आहे. ● संपादक– ✻ अनंत सा. पाटील : ☎ (०२४२२) २२२४६४,२२२६२९. फॅक्स : २२२७९४. अहमदनगर कार्यालय : ☎ (०२४१) २४३११०३/०४ फॅक्स : (०२४१) २४३११०५. R.N.I Regi. No. 31816/1976. पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. रजि. नं. बी.आय.आय./आर.एन.पी./एस.आर.पी./००३/२०२१-२३ (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे)